# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id -collector.pune@maharashtra.gov.in


जि.का./कं.आ.व्य./कावि/२४९३/२०२१ दिनांक :- ०८/०८/२०२१

जिल्हाधिकारी पुणे

वाचले :- १. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७,
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/ग. फ्र. ५८/आरोग्य-५,दि.१३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोगीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. मा. मुख्य सचिव,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No.DMU/2020 / CR.92/DisM-१ दि.२९/०१/२०२१, दि.१५/०३/२०२१, दि.०४/०४/२०२१, दि.१३/०४/२०२१, दि.२०/०४/२०२१, दि.२१/०४/२०२१ रोजीचे आदेश.
७. या कार्यालयाकडील क्रं.जि.का./आ.व्य/कावि/१५८,२४२,३४१,३६२,४९६,५६७,४८८,५९५,६७२,९७३,९९३,१२४८ दि.१८.०२.२०२१, १२.०३.२०२१, २७.०३.२०२१ , ०२.०४.२०२१,०५.०४.२०२१ ,१४.०४.२०२१, २०.०४.२०२१ ,२२.०४.२०२१ , २९.०४.२०२१, १३.५.२०२१ , १४.५.२१, २८.५.२०२१ व ३१.०५.२०२१ रोजीचे आदेश
८. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक २९/०४/२०२१ रोजीचे आदेश
९. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक १२/०५/२०२१ रोजीचे आदेश
१०. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक ३०/०५/२०२१ रोजीचे आदेश
११. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक ०४/०६/२०२१ रोजीचे आदेश
१२. मा.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92 /DisM-१. दिनांक २५/०६/२०२१ रोजीचे आदेश
१३. मा.मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. कोरोना/२०२१/CR.३६६ /arogya-५. दि.०२/०८/२०२१ रोजीचे आदेश
१४. मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांची दि.०८.०८.२०२१ रोजीचे बैठकीमध्ये दिलेल्या सुचना .

---

**विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "Levels of Restrictions for Breaking the Chain" प्रतिबंधात्मक आदेश.**

**आदेश :-**

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

**ज्याअर्थी,** राज्य शासनाने वाचले क्रं.०४ अन्वये कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करून २.३.४ मधील तरतुर्दीच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे, त्याबाबतची नियमावली प्रसिद्ध केली असुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडील उपरोक्त वाचले क्र.११,१२ व १३ अन्वये कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी **"(Levels of Restrictions for Breaking the Chain)"** बाबत मर्यादित निर्बंधस्तर जिल्हानिहाय घोषित करणेत आलेले आहेत. त्यानुसार पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्राचा समावेश मर्यादित निर्बंधस्तर - ३ मध्ये होत आहे. तसेच पुणे व खडकी छावणी परिषद कार्यक्षेत्राचा समावेश पुणे महानगरपालिका हद्दीजवळ व देहू रोड छावणी परिषद कार्यक्षेत्राचा समावेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीजवळील क्षेत्रात होत आहे.

**त्याअर्थी, मी डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे जिल्हा** ग्रामीण कार्य क्षेत्रातील कोव्हीड-१९ सरासरी पॉझिटीव्हीटी दर हा **५.५%** असून ऑक्सीजन बेड ऑक्यूपन्सी **११.२%** आहे. त्यामुळे पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील **सर्व क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीत** प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन मर्यादित **निर्बंधस्तर- ३** प्राप्त अधिकारान्वये खालीलप्रमाणे लागू करीत आहे.

- **पुणे व खडकी छावणी परिषद -** पुणे व खडकी छावणी परिषद कार्यक्षेत्र पुणे महानगरपालिका हद्दीजवळ येत असल्याने आयुक्त पुणे महानगरपालिका यांचे आदेशातील अटी व शर्तीचे अधिन राहून छावणी परिषद हद्दीतील सर्व उपक्रम व कृतींना परवानगी राहील.
- **देहू रोड छावणी परिषद -** देहू रोड छावणी परिषद कार्यक्षेत्र पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीजवळ येत असल्याने आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे आदेशातील अटी व शर्तीचे अधिन राहून छावणी परिषद हद्दीतील सर्व उपक्रम व कृतींना परवानगी राहील.

१) सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील सर्व दुकाने आठवड्यातील सर्व दिवस (दुकानाची साप्ताहीक सुटटी वगळुन) दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

२) मॉल, सिनेमागृह (Single Screen and Multiplex) नाट्यगृह, संपूर्णतः बंद राहतील.

३) रेस्टॉरंट, बार, फुड कोर्ट हे सर्व दिवस (दुकानाची साप्ताहीक सुटटी वगळुन) दुपारी ४.०० वाजेपर्यंत आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. दुपारी ४.०० नंतर फक्त पार्सल सेवा/घरपोच सेवा (Home Delivery) सुरु राहील.

४) लोकल ट्रेन मधून फक्त वैद्यकीय सेवेसाठी अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी व महिलांसाठी शासकीय कर्मचारी, विमानतळ सेवा (Airport Services), बंदरे सेवा (Port Services) यांच्या कर्मचाऱ्यांना प्रवास करणेस परवानगी राहील.

५) सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील सार्वजनिक ठिकाणे (उद्याने), खुली मैदाने, चालणे व सायकलिंग आठवड्यातील सर्व दिवस सकाळी ०६.०० ते सकाळी १०.०० व सायंकाळी ४.०० ते सायंकाळी ०७.०० या वेळेत सुरु राहतील.

६) सुट देण्यात येत असलेल्या आस्थापना/सेवा (Exemption Category) व्यतिरिक्त सर्व खाजगी कार्यालये कामाचे दिवशी (working days) ५०% कर्मचारी क्षमतेने दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

७) सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील सर्व अत्यावश्यक सेवा व कोविड १९ व्यवस्थापनाशी संबंधित शासकीय कार्यालये (Government Offices and Emergency Services required for Covid-19 Management) १००% क्षमतेने सुरु राहतील.

८) सर्व आऊटडोअर स्पोर्ट्स ( outdoor games) सर्व दिवस सकाळी ०५.०० ते सकाळी ०९.०० या वेळेत सुरु राहतील.

९) सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम व मनोरंजन कार्यक्रम यास ५० लोकांच्या उपस्थितीत दुपारी ०४.०० वाजपर्यंत परवानगी राहील.

- उपरोक्त कार्यक्रमाचा कालावधी हा ३ तासांपेक्षा जास्त असू नये.
- सदर ठिकाणी खाद्यपदार्थचे सेवन करण्यास प्रतिबंध राहील.
- सदर कार्यक्रमात Covid Appropriate Behaviour (CAB) चे पालन करावे.
- आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनाचे परवाना रद्द करणे अथवा मे. केंद्र शासन कोविड १९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील.

१०) सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील सर्व धार्मिक स्थळे नागरिकांसाठी पूर्णपणे बंद राहतील. सदर ठिकाणी दैनंदिन पूजा / अर्चा करण्याकरिता परवानगी राहील.

११) लग्न समारंभ कार्यक्रम जास्तीत जास्त ५० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. शासनाकडुन निर्गमित केलेल्या आदेशातील अटी / मार्गदर्शक सूचनांनुसार धार्मिक स्थळी विवाह संबंधित कार्यक्रम मर्यादित लोकांच्या उपस्थितीत करण्यास परवानगी राहील.

१२) अंत्यसंस्कार, दशक्रिया व त्यांच्याशी निगडीत कार्यक्रम जास्तीत जास्त २० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. मे. शासनाने निर्गमित केलेल्या आदेशातील अटी / मार्गदर्शक सूचनांनुसार धार्मिक स्थळी अंत्यविधीशी संबंधित कार्यक्रम मर्यादित लोकांच्या उपस्थितीत करण्यास परवानगी राहील.

१३) सर्व ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीमधील ज्या बांधकामाच्या ठिकाणी कामगारांची राहण्याची व्यवस्था आहे असे बांधकाम सुरु ठेवता येतील. तथापि, बाहेरून येणारे कामगार असल्यास असे बांधकाम दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी राहील. मात्र बाहेरून येणारे कर्मचारी हे दुपारी ०४.०० वाजता तेथून घरी जाण्यासाठी बाहेर पडतील.

१४) कृषी संबंधित दुकाने आणि त्यांच्याशी संबंधित आस्थापना ( बी-बियाणे, खते, उपकरणे व त्यांच्याशी निगडीत देखभाल व दुरुस्ती सेवा इत्यादी) तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती मधील शेतमालाची विक्री करणारे दुकाने/गाळे हे आठवड्यातील सर्व दिवस दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

१५) ई-कॉमर्स सेवांना सर्व वस्तू व सेवा यांचा पुरवठा करण्याकरिता परवानगी राहील.

१६) व्यायामशाळा (Gym), सलून, ब्युटी पार्लर, स्पा,wellness centers आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने पूर्व नियोजित वेळेनुसार (by appointment) दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. सदर ठिकाणी वातानुकूल (A.C) सुविधा वापरता येणार नाही.

१७) सर्व क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील सार्वजिक वाहतूक व्यवस्था (PMPML) आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने (without standing) सुरु राहील.

१८) माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना व त्यामध्ये जास्तीत जास्त ३ व्यक्ती (चालक + क्लीनर/ मदतनीस) यांना इतर प्रवाश्यांना लागू असलेल्या नियमानुसार प्रवास करणेस परवानगी राहील.

१९) Export oriented units (including MSMEs that need to fulfill export obligation) मधिल उत्पादन नियमितपणे सुरु राहील.

२०) खालील उत्पादन क्षेत्र / उद्योग नियमितपणे सुरु राहतील.

अ) अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग (Essential goods manufacturing units) (अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना लागणारा कच्चा माल उत्पादन करणारे युनिट,त्याची पॅकेजिंग करणारे युनिट आणि संपूर्ण पुरवठा साखळी यासह).

ब) सतत प्रक्रिया करणारे उद्योग (All continuous process industries) - (Units that require process that are of such a nature that these cannot be stopped immediately and cannot restart without considerable time requirement)

क) राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षणाशी संबंधित उत्पादन करणारे उद्योग. (Manufacturing of items that significant to National Security and Defence)

ड) Data Centers/Cloud Service providers/ IT Services supporting critical infrastructure and services.

२१) उपरोक्त मुद्दा क्रं.१९ व २० येथे नमूद केलेल्या उद्योगांव्यतिरिक्त इतर सर्व उत्पादन क्षेत्र हे ५०% कर्मचारी क्षमतेने सुरु राहतील. कर्मचारी ने-आण कण्यासाठी संबंधित उद्योगांनी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था करावी. सदर कर्मचाऱ्यांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास करता येणार नाही.

२२) उपरोक्त आदेशामध्ये परवानगी देण्यात आलेल्या ज्या अस्थापना दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी तसेच त्या ठिकाणावरून सेवा घेणारे नागरिक यांनी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत त्यांचे घरी पोहोचणे अपेक्षित आहे.

२३) सर्व क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांचे नियमित वर्ग पुढील आदेश होईपर्यंत बंद राहतील. सर्व प्रकारचे कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण संस्था पूर्णतः बंद राहतील. मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.

- मात्र कोविड १९ चे व्यवस्थापनाकरिता वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत Skill Development प्रशिक्षण कोर्सेस सुरु राहतील. त्यांनी Covid Appropriate Behaviour (CAB) चे पालन करावे.

२४) शासनाकडील व या कार्यालयाकडील संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/ मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

२५) सदरचे आदेश हे सर्व क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील कोविड- १९ सरासरी पॉझिटीव्हीटी दर व ऑक्सिजन बेड ऑक्यूपन्सी यांचे टक्केवारीनुसार शासनाने निश्चित केलेल्या लेवल विचारात घेऊन केलेले आहेत. जर त्यामध्ये वाढ / कमी झाल्याचे आढळून आल्यास याबाबत आढावा घेऊन सुधारित आदेश निर्गमित केले जातील.

**२६) सर्व क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीतील कार्यक्षेत्रात सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ५ पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास (जमावबंदी) प्रतिबंध राहील तसेच सायंकाळी ०५.०० नंतर (अत्यावश्यक कारण वगळता) संचारबंदी लागू राहील.**

कोविड 19 चे विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर ठेवणे याचे काटेकोरपणे पालन करावे तसेच कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील. सदर आदेश दि.०८.०८.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

**सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.०८.०८.२०२१ रोजी दिलेला आहे.**

**(डॉ.राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

प्रति,

सर्व नागरिक व आस्थापना पुणे जिल्हा

प्रत :- मा. आयुक्त पुणे व पिंपरी चिचवड महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

प्रत :-

१. मा.पोलीस आयुक्त पुणे व पिंपरी चिंचवड यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
२. आयुक्त पी.एम.आर.डि.ए यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
४. पोलीस अधीक्षक, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
५. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
७. सहा.आयुक्त,अन्न व औषध प्रशासन, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
८. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
९. प्रादेशिक अधिकारी, म. औ.वि. महामंडळ, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
११. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व), यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१२. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व), यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१३. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका/नगरपरीषद / नगरपंचायत,मुख्य कार्यकारी अधिकारी छावणी परिषद पुणे,खडकी,देहुरोड यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१४. सर्व गटविकास अधिकारी, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
१५. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांचेकडे उपरोक्त आदेश जनतेच्या माहितीसाठी पुणे

२/- जिल्ह्यातील सर्व दैनिक/दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१६. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.

प्रत- मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग पुणे माहितीसाठी सविनय सादर